# CENTER FOR INVENTION, INNOVATIONM, INCUBATION AND TRAININGX (CIIIT)

## गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व

## महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने

## Request For Proposal (RFP)

## प्रशिक्षणार्थांचे निवास व भोजन व्यवस्थेकरीता

Center For Invention Incubation and Training (CIIIT) येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्योगकेंद्रित अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ८० विद्यार्थ्यांची निवास आणि भोजन व्यवस्था १ वर्षाकरिता पुरविण्याबाबत.

जिल्हा परिवर्तन समिती, महाराष्ट्र शासन व टाटा टेक्नोलॉजीस लि. यांच्या संयुक्त विद्यमाने Center For Invention Incubation and Training (CIIIT) ची स्थापना दि. १५ नोव्हेंबर २०२३ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे करण्यात आलेली आहे. सदर प्रशिक्षण केंद्रामार्फत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (SC- ST) या घटकातील ८० उमेदवारांकरीता उद्योगकेंद्रित अभ्यासक्रमाचे निवासी प्रशिक्षण राबविण्यात व पुढील सेवा १वर्षाकरिता पुरविण्यांबाबत प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण Center For Invention Incubation and Training (CIIIT) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे आयोजित करण्यात येणार आहे. यामुळे सदर परिसरात पुढील सेवांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

१. **गडचिरोली परिसरात निवासव्यवस्था**

निवास व्यवस्थेमध्ये स्वच्छ, सुरक्षीत आणि हवेशीर खोल्या व त्यातील सुविधेत कॉट, गादी, उशी, चादर, कपाट, खुर्ची, पंखा, स्टडी टेबल, २४ तास विज व २४ तास पिण्याचे पाणी असावे.

२४ तास सुरक्षा रक्षक/रेक्टर पुरविणे बंधणकारक राहिल.

प्राथमिक उपचाराची सुविधा पुरविणे बंधणकारक राहिल. तसेच तातडीच्या वैद्यकीय गरजांसाठी जिल्हा वैद्यकीय रूग्णालयात दाखल करणे बंधणकारक राहिल.

२. **भोजन व्यवस्था**

जेवणाचे प्रकार: दररोज ४ वेळा पौष्टिक आणि संतुलित आहार (सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, संध्याकाळचा अल्पोआहार आणि रात्रीचं जेवण.)

मेनू: मेनूमध्ये स्थानिक (मराठी/भारतीय) पदार्थांचा समावेश असावा आणि तो संस्थेच्या प्रतिनिधीने मंजूर केलेला असावा.

पाण्याची व्यवस्था: २४ तास पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध असावे.

स्वच्छता: स्वयंपाकघर आणि जेवणाच्या क्षेत्राची उच्च दर्जाची स्वच्छता राखणे अनिवार्य आहे.

३. **प्रशिक्षण ठिकाण ते निवासव्यवस्था दरम्यान वाहतुक व्यवस्था पुरविणे**

प्रशिक्षणार्थांना निवास स्थानावरून प्रशिक्षण स्थानापर्यंत सकाळी सोडणे व प्रशिक्षण संपल्यानंतर प्रशिक्षण स्थानावरून निवास स्थानापर्यंत पोहचविणे.

वरिल सर्व सेवांचा पुरवठा करण्यास इच्छुक व अनुभवी उमेदवारांनी त्यांचे पॅन कार्ड, आधार कार्ड, जी.एस.टी. (लागू असल्यास) इत्यादी कागदपत्रासह संलग्नीत "परिशिष्ठ–अ" तक्त्यात आपले दर प्रति विद्यार्थी नमुद करून मा. प्राचार्य आदर्श पदवी महाविद्यालय यांचे कार्यालयात दिनांक ३१/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता पर्यंत सादर करावे.

प्राचार्य
आदर्श पदवी महाविद्यालय तथा
समन्वयक (CIIIT)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# परिशिष्ठ — अ

प्रति,

प्राचार्य,
आदर्श पदवी महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

CIIIT येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्योगकेंद्रीत अभ्यासक्रमाचे ८० विद्यार्थ्यासाठी निवास, भोजन व वाहतुक व्यवस्था यांचे एकत्रित दर खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विवरण | दर (प्रती विद्यार्थी प्रती दिवस) | दर (प्रती विद्यार्थी प्रती महिना) |
|---|---|---|---|
| १ | निवास,भोजन, वाहतुक, इतर मागणी प्रस्तावातील सर्व सुविधा पुरविण्याचे दर | | |

उमेदवारांचे नाव:———————————————

स्वाक्षरी:—————————————————

मो. नं.:——————————————————

ई—मेल:——————————————————